# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


जा.क्र.मनपा/आस्था/ 554 /2025-26 दि. 22/05 /2025

प्रति,
सिस्टिम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण विभागाकरीता सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी सेवा करार पध्दतीने घेणेकरीता जाहिर सूचना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.....

संदर्भ :- मा.आयुकत महोदय यांची दि.28/05/2025 रोजीची मंजूरी

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण विभागाकरीता सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी सेवा करार पध्दतीने घेणेकरीता मा. आयुक्त महोदय यांनी दि. 28/05/2025 रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण विभागाकरीता सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी सेवा करार पध्दतीने घेणेकरीता जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(सुनिल यादव)
सहा.आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहीर सूचनेची प्रत

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/ 554 /2025-26 दि. 22 / 05 /2025

**शासनाकडील सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी सेवाकरार पध्दतीने नियुक्त करणेबाबत.**

## // जाहीर सूचना //

आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका लेखापरीक्षण विभागासाठी शासनाकडील/महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून सेवाकरार पध्दतीने लेखापरीक्षण अधिकारी पदासाठी खालीलप्रमाणे कामकाजाचा अनुभव पूर्ण करणाऱ्या इच्छुक व पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतींचा एक संच व मूळ प्रमाणपत्रांसह मा. स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) जि. ठाणे 401101 येथे दि. 05/06 /2025 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी (Walk in Interview) उपस्थित राहावे.

याबाबतची जाहीर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलबध करण्यात आलेली आहे.

**उपलब्ध पद संख्या-**

| अ.क्र | पदाचे नाव | पद संख्या | कामकाजाचा अनुभव |
|---|---|---|---|
| 1. | लेखापरीक्षण अधिकारी (सेवा करार पध्दतीने) | 02 | सहा.लेखाधिकारी / सहा. लेखापरीक्षा अधिकारी / लेखाधिकारी अथवा उच्च पदावरील कामाचा किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक. |

**अटी व शर्ती-**

1) उमेदवार शासनाच्या वित्त विभागातून सेवानिवृत्त झालेला असावा.
2) सा.प्र.वि शासन निर्णय क्र. संकिर्ण-2715/प्र.क्र.100/13 दि.17/12/2016 तसेच शासन निर्णय क्र. संकिर्ण-2715/प्र.क्र.100(भाग-1)/13 दि.08/09/2023 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
3) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांचे मासिक पारिश्रमिक व भत्ते दि.23 सप्टेंबर 2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात येईल.
4) करार पध्दतीने नेमणुकीकरीता अर्ज करते वेळी सेवानिवृत्त अधिका-याचे वय 65 वर्षा पेक्षा अधिक नसावे

Scanned with OKEN Scanner

5) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त 01 वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नुतनीकरण करता येईल. परंतु एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

6) नियुक्तीच्या कालावधीमध्ये लेखापरिक्षण विभागात सोपविलेले लेखापरिक्षणाचे कामकाज करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल व तसे हमी पत्र/बंध पत्र घेण्यात येईल.

7) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात / मनपामध्ये सेवा समावेशनाबाबत / सामावुन घेण्याबाबतचा अधिकार / हक्क नसेल.

8) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा चालु प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

9) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

10) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोण्यत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

Scanned with OKEN Scanner